




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक ५६ * नांदेड * शुक्रवार, दि. २८ फेब्रुवारी २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## लाखोंच्या साक्षीने महाकुंभ समाप्त

### ४५ दिवसांमध्ये ६५ कोटी भाविकांनी स्नान केल्याचा दावा

**प्रयागराज (प्रतिनिधी)–** देशभरातून आलेल्या मोठ्या संख्येतील भाविकांनी 'हर हर महादेव'च्या जयघोषात बुधवारी महाशिवरात्रीला त्रिवेणी संगमावर पवित्र स्नानाचा लाभ घेतला. १३ जानेवारीपासून सुरू झालेला आणि गेले ४५ दिवस सुरू असलेला हा धार्मिक सोहळा महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर समाप्त झाला. या ४५ दिवसांमध्ये जवळपास ६५ कोटी भाविकांनी महाकुंभमध्ये स्नान केल्याचा दावा केला जात आहे.

पौष पौर्णिमाला प्रारंभ झालेल्या या उत्सवात नागा साधूंची भव्य मिरवणूक आणि तीन अमृत स्नान झाले. सरकारने दिलेल्या आकेडवारीनुसार, यावर्षी प्रयागराज कुंभमध्ये ६५ कोटींहून अधिक भाविकांनी स्नान केले. जगातील सर्वात मोठा अध्यात्मिक मेळावा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, कुंभमेळ्यात अखेरच्या दिवशीही देशभरातील लाखो भाविकांनी हजेरी लावली.

महाशिवरात्रीला प्रयागराज मध्ये खास उभारण्यात आलेल्या महाकुंभनगरमध्ये चहूबाजूंनी 'हर हर महादेव', 'जय महाकाल'चा गजर होत होता. महाशिवरात्री हा उत्सव शिव-पार्वती यांच्या दैवी मिलनाचे प्रतीक असून कुंभमेळ्याच्या संदर्भात तिचे विशेष महत्त्व आहे.

दरम्यान, संगम, घाट परिसर आणि पाचही शिवालय परिसरात गर्दीच्या व्यवस्थापनासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तर दुसरीकडे, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गोरखपूर येथून वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांसमवेत कुंभमेळ्यातील व्यवस्थेवर देखरेख केली. शेवटच्या दिवशी स्नान करणाऱ्या भाविकांवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी देखील करण्यात आली.

## लिंबोटी धरणात पोहण्यासाठी गेलेल्या दोन बालकांचा बुडून मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)–** लिंबोटी धरणाच्या शेजारीच असलेल्या गोंडगाव येथील दोन बालक पोहण्यासाठी गेले असता त्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना दि. २४ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजेच्या दरम्यान घडली.

लोहा तालुक्यातील गोंडगाव येथील राहणारे अंश संजय सोनवणे (१२) आणि रोहित गौतम साबणे (वय १८) हे दोघेजण पोहण्यासाठी लिंबोटी धरणात गेले. धरणातील पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला. ही माहिती गावात वाऱ्यासारखी पसरताच गावकऱ्यांनी लिंबोटी धरणावर धाव घेतली. रामदास वाघमारे यांनी माळाकोळी पोलिसांना सदर घटनेची दिल्यानंतर माळाकोळी पोलिसांनी घटनास्थळी जाऊन दोन्ही मृतदेह पाण्याबाहेर काढले. याप्रकरणी माळाकोळी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक बोंबले करीत आहेत. या घटनेमुळे गोंडगावावर शोककळा पसरली आहे.

## २७ वर्षीय तरूणाचा तंबाखूच्या भट्टीत पडून मृत्यू



**बिलोली (प्रतिनिधी)–** तंबाखूची पाने वाळावीत म्हणून धुवा देण्यासाठी उभारण्यात आलेल्या भट्टीतील विस्तवाच्या खड्ड्यात तोल जाऊन एका २६ वर्षीय तरूणाचा मृत्यू झाला. ही घटना दि. २६ फेब्रुवारी रोजीच्या रात्री १२ ते १ वाजेच्यादरम्यान घडली.

बिलोली तालुक्यातील मौजे सावळी येथील राहुल सुरेश देवकरे (२६) या तरूणाने शेतात तंबाखूची लागवड केली होती. तंबाखूची पाने वाळविण्यासाठी पानांना धुव्वा द्यावा लागतो. त्यामुळे तंबाखूच्या पानांना धुवा देण्यासाठी देवकरे याने शेतातच भट्टी उभारली होती. दि. २६ फेब्रुवारी रोजी रात्री १२ ते १ वाजेच्या दरम्यान भट्टीतील विस्तवाच्या खड्ड्यात राहुल याचा तोल गेला. यातच त्याचा भाजून मृत्यू झाला. मयत राहुल देवकरे याच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. राहुल याच्या निधनामुळे सावळी गावावर शोककळा पसरली आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार आज नांदेडमध्ये

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे आज नांदेड दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे.



शुक्रवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी मुंबई येथून विमानाने सकाळी ९.३० वाजता श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळ येथे आगमन. सकाळी ९.३५ वाजता मोटारीने प्रयाण, नंतर स्वागत रॅली. नंतर श्री हुजूर साहिब गुरूद्वारा अबचलनगर, नांदेड येथे दर्शन. सकाळी १०.४५ वाजता मोटारीने ओम गार्डन, कौठा, नांदेड जि.नांदेड येथे आगमन. सकाळी १०.४५ वाजता पक्षप्रवेश कार्यक्रम. नंतर दुपारी १२.२० वाजता कौठा येथे आगमन. दुपारी १२.२० वाजता माजी आ. मोहनराव हंबर्डे यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन. दुपारी १२.४५ वाजता मोटारीने आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे दिपक-ज्योती निवासस्थान, बोरबन येथे आगमन. दुपारी १२.४५ वाजता राखीव. दुपारी १.५५ मोटारीने कौठा हेलिपॅड असर्जन मैदान ता. जि. नांदेड येथे आगमन. दुपारी २ वाजता हेलिकॉप्टरने उमरज हेलिपॅड, ता. कंधार जि. नांदेडकडे प्रयाण. दुपारी २.२० वाजता उमरज हेलिपॅड, ता. कंधार, जि. नांदेड येथे आगमन. दुपारी २.३० वाजता मोटारीने उमरज, ता. कंधार, जि. नांदेड येथे आगमन. दुपारी २.३० वाजता महंत श्री गुरु एकनाथ नामदेव महाराज यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी ३.३५ वाजता मोटारीने बोरी बु. ता. कंधार, जि. नांदेड येथे आगमन. दुपारी ३.३५ वा. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आयोजित केलेल्या देवस्थानच्या कार्यक्रमास उपस्थिती. सायं. ४.३५ वाजता मोटारीने उमरज हेलिपॅड, ता. कंधार, जि. नांदेड येथे आगमन. सायं. ४.४० वाजता हेलिकॉप्टरने परभणीकडे प्रयाण करतील. रात्री १०.३५ वाजता परभणी येथून मोटारीने श्री गुरु गोविंदसिंघजी विमानतळ, नांदेड येथे आगमन. रात्री १०.४० वाजता विमानाने पुणेकडे प्रयाण करतील.













जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार


संपादक
केशव घोणसे पाटील

# मराठी भाषेचे भविष्य : गौरवापलीकडे विचार करण्याची गरज

दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी मराठी गौरव दिन साजरा केला जातो. हा दिवस मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेचा, तिच्या साहित्यिक वारशाचा आणि सांस्कृतिक महत्त्वाचा गौरव करण्यासाठी महत्त्वाचा मानला जातो. यंदा मराठी साहित्य संमेलन नवी दिल्ली येथे पार पडले असून, मराठी भाषेच्या भवितव्यावर नव्याने विचार करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. परंतु मराठी भाषेच्या सध्याच्या अवस्थेचा विचार करता, फक्त गौरव करून काहीही साध्य होणार नाही. मराठी भाषेची प्रगती होण्यासाठी ठोस प्रयत्न करणे आवश्यक आहे. गेल्या काही दशकांमध्ये इंग्रजी भाषेची वाढती घुसखोरी मराठीच्या अस्तित्वावर गंभीर परिणाम करत आहे. शाळांपासून ते महाविद्यालयांपर्यंत, उद्योगक्षेत्रांपासून ते शासकीय कार्यालयांपर्यंत इंग्रजीचा प्रभाव वाढत आहे. पालकांचा आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पाठवण्याकडे कल वाढला आहे. परिणामी, मराठी भाषेतील संवाद कमी होत आहे. दैनंदिन जीवनातच नव्हे, तर व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्रातही मराठी भाषेचा वापर कमी झाला आहे. यामुळे सध्या मराठी साहित्याचे भवितव्यही चिंताजनक वाटते. एकेकाळी मराठी साहित्याने समाजप्रबोधन आणि परिवर्तन घडवले. पु. ल. देशपांडे, वि. स. खांडेकर, श्री. द. फडके, ग. दि. माडगूळकर यांसारख्या साहित्यिकांनी मराठी वाड्.मय समृद्ध केले. परंतु आज सकस मराठी साहित्याची कमतरता भासत आहे. त्यातच सध्याच्या डिजिटल युगात वाचनसंस्कृती लुप्त होत चालली आहे. टीव्ही, मोबाईल आणि इंटरनेटमुळे मनोरंजनाचे पर्याय वाढले असले तरी त्याचा वाचनसंस्कृतीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. पूर्वीच्या पिढ्या जी उत्साहाने पुस्तके वाचायच्या, तो उत्साह आज दिसत नाही. अनेकांना वाचनाचा कंटाळा येतो, तर काहींना वेळ मिळत नाही. यामुळे केवळ मराठी नव्हे, तर सर्वच भारतीय भाषांमध्ये दर्जेदार साहित्य वाचणाऱ्यांची संख्या घटली आहे. मराठी भाषेच्या अवमूल्यनाचा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शासकीय कार्यालयांमध्ये इंग्रजीचा प्राधान्याने वापर. महाराष्ट्र सरकारने अनेक वेळा मराठी भाषेचा वापर अनिवार्य करण्याचे आदेश दिले, परंतु प्रत्यक्षात बहुतांश कार्यालयांमध्ये इंग्रजीचाच सर्रास वापर केला जातो. कायद्याने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला असला, तरी प्रत्यक्ष व्यवहारात तिची उपेक्षा होत आहे. मराठी गौरव दिन साजरा करणे ही अभिमानाची बाब असली, तरी फक्त गौरव करून भाषेचा विकास होणार नाही. मराठी भाषेच्या प्रगतीसाठी ठोस कृती करावी लागेल. पहिली गरज आहे ती मराठी माध्यमातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्याची. मराठी भाषेतील शिक्षण प्रतिष्ठेचे आणि भविष्य सुरक्षित करणारे असले, तर पालक आपल्या मुलांना मराठी माध्यमाच्या शाळेत पाठवण्यास तयार होतील. दुसरे महत्त्वाचे पाऊल म्हणजे सरकारी आणि खासगी क्षेत्रात मराठीला आवश्यक तो सन्मान मिळावा. सरकारी कार्यालयांमध्ये मराठी भाषा सक्तीची असली पाहिजे. मराठीतून अर्ज, पत्रव्यवहार आणि इतर व्यवहार अनिवार्य करण्यासोबतच नागरिकांनीही मराठीतून संवाद साधावा. तिसरे म्हणजे मराठी साहित्य आणि वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देणे. दर्जेदार मराठी साहित्याची निर्मिती होण्यासाठी नवोदित लेखकांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. तसेच ग्रंथालये, पुस्तक मेळावे आणि वाचन कार्यशाळा यांच्या माध्यमातून मराठी वाचनसंस्कृतीला बळ दिले पाहिजे. शेवटी मराठी भाषा फक्त गौरवाची बाब न राहता, ती रोजच्या व्यवहाराची भाषा बनली पाहिजे. प्रत्येक मराठी भाषिकाने स्वतःपासून सुरुवात करून आपल्या घरात, कार्यालयात आणि समाजात मराठीचा अधिकाधिक वापर करावा. भाषेचा विकास हा केवळ सरकारी योजना किंवा नियमांवर अवलंबून नसतो, तर तो समाजाच्या सामूहिक प्रयत्नांवर अवलंबून असतो. म्हणूनच तर मराठी गौरव दिन साजरा करणे ही चांगली गोष्ट आहे, पण मराठी भाषेचे अस्तित्व आणि भवितव्य केवळ साजरे करण्याने टिकणार नाही. इंग्रजीच्या प्रभावाखाली हरवत चाललेल्या मराठीला वाचवण्यासाठी आणि विकसित करण्यासाठी शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि दैनंदिन व्यवहारांमध्ये मराठीला पुनर्स्थापित करणे आवश्यक आहे. मराठी भाषेचा खरा गौरव तिच्या जतनात आणि वृद्धीत आहे, केवळ तिच्या गौरवगीतांमध्ये नाही.

# राष्ट्रीय विज्ञान दिन व वैज्ञानिक दृष्टिकोन

२८ फेब्रुवारी या दिवशी राष्ट्रीय विज्ञान दिन भारतात साजरा केला जातो.भारतीय शास्त्रज्ञ डॉ सी व्ही रमण यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी लावलेल्या रामन परिणामाच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्यात येतो. या विषयी माहिती देणारा हा लेख...



भारत हा नवोन्मेषकांचा देश आहे. भारतात अनेक प्रतिभावान लोक आहेत. भारतीय शास्त्रज्ञांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर भारताला अविकसित राष्ट्राकडून एका विकसनशील अशा राष्ट्राकडे नेलेले आहे.शून्याचा शोध लावणाऱ्या आर्यभट्टांपासून ते पायचे मूल्य मोजण्याचे सूत्र शोधणाऱ्या रामानुजमपर्यंत अनेक भारतीय शास्त्रज्ञांनी वैज्ञानिक क्रांती केलेली आहे. भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ एपीजे अब्दुल कलाम यांना भारताचे क्षेपणास्त्र पुरुष म्हणून ओळखले जाते. सुपर कम्प्युटरचे निर्माते डॉ विजय भटकर यांना भारतीय संगणक क्रांतीचे जनक मानले जाते. श्री सतीश धवन हे भारतीय रॉकेट शास्त्रज्ञ आणि अवकाश शास्त्रज्ञ म्हणून जगप्रसिद्ध आहेत. इस्रोचे संचालक के शिवन यांनी भारतीय अंतराळ क्षेत्रात अतुलनीय कार्य केलेले आहे.श्री अजय भट्ट हे एक संगणक आर्किटेक्ट आहेत ज्यांना यूएसबी चे सहशोधक म्हणूनही ओळखले जाते.

भारताच्या हरित क्रांतीमध्ये डॉ. बी पी पाल, डॉ स्वामीनाथन यांचे प्रमुख योगदान आहे. श्री जयंत नारळीकर हे एक भारतीय खगोल भौतिकशास्त्रज्ञ आहेत तर अनिल काकोडकर हे एक भारतीय अणु भौतिकशास्त्रज्ञ आहेत. अशा एक ना अनेक शास्त्रज्ञांनी आपल्या भारत देशात वैज्ञानिक क्रांती घडवलेली आहे.

विद्यार्थ्यांना विज्ञानात आवड निर्माण करणे आणि या क्षेत्रातील संशोधकांचा सन्मान करणे व विद्यार्थ्यांना नवीन प्रयोग करण्यासाठी प्रेरित करणे तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञानातील घडामोडीं ची माहिती देणे हा राष्ट्रीय विज्ञान दिनाचा उद्देश आहे. दरवर्षी या दिवशी भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे विविध क्षेत्रांतील शास्त्रज्ञांचा त्यांच्या विज्ञानातील असाधारण अशा योगदानाबद्दल सत्कार करण्यात येतो.राष्ट्रीय विज्ञान दिनाचे मुख्य उद्दिष्ट लोकांमध्ये जीवनातील विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या महत्त्वाबद्दल जागरूकता वाढवणे हा आहे.

भारतीय शास्त्रज्ञ डॉ सी व्ही रामन यांना रामन इफेक्ट नावाच्या प्रकाश विखुरण्याच्या अभ्यासातील योगदानाबद्दल १९३० मध्ये भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले आहे.रामन परिणाम हे जेव्हा प्रकाश पारदर्शक माध्यमामधून जातो तेव्हा त्याचे किरण विखुरण्याची क्रिया होते. प्रकाशाचे किरण ज्या पद्धतीने विखुरतात त्या प्रक्रियेला 'रमन इफेक्ट 'असे म्हटले जाते. लॅब मध्ये जेव्हा या इफेक्टचा वापर काही संशोधनात केला जातो, तेव्हा या प्रक्रियेला 'रामन स्पेक्ट्रोस्कोपी' असे म्हणतात. याचा वापर शास्त्रज्ञ रसायनशास्त्रात आणि भौतिकशास्त्रात पदार्थांचे विश्लेषण करण्यासाठी करतात. 'रामन स्पेक्ट्रोस्कोपी हे पर्यावरणीय आणि पर्यावरणविषयक अभ्यासातील एक प्रमुख संशोधन साधन आहे.

दरवर्षी भारत सरकार तर्फे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त एक थीम ठरवली जाते व त्या अंतर्गत वर्षभर संशोधन क्षेत्रातील वेगवेगळे कार्यक्रम घेतले जातात. राष्ट्रीय विज्ञान दिन २०२५ ची थीम आहे विकसित भारतासाठी विज्ञान आणि नवोपक्रमातील जागतिक नेतृत्वासाठी भारतीय तरुणांना सक्षम बनवणे. भारतातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि संशोधन संस्था विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी आणि वैज्ञानिक प्रगतीमध्ये रस निर्माण करण्यासाठी विज्ञानातील वेगवेगळ्या विषयावरील निबंध लेखन, भाषण स्पर्धा, प्रदर्शने, संशोधकांची व्याख्याने यासारखे विविध उपक्रम आयोजित करतात. वेगवेगळ्या संशोधन संस्था त्यांनी केलेल्या कामाचे प्रदर्शन आयोजित करतात.

विज्ञानामुळे माणसाच्या आयुष्यामध्ये अनेक भौतिक सुविधा प्राप्त झालेल्या आहेत. विज्ञानामुळेच मानवाचे राहणीमान सुधारलेले आहे.आरोग्य सुधारले आहे व आयुष्य वाढलेले आहे. असाध्य अशा रोगांवर सुद्धा विज्ञानाच्या क्रांतीने उपाय शोधलेले आहेत.नुकत्याच झालेल्या कोरोना महामारीवर सुद्धा आपल्या भारतीय शास्त्रज्ञांनी विकसित केलेली लस सपूर्ण जगातील लोकांसाठी उपयुक्त ठरली.मानवाची जाणून घेण्याची जिज्ञासा, कुतूहलामुळेच विज्ञान व नवनवीन आविष्कार निर्माण होतात आणि हेच कुतूहल मानवाची सर्वात महत्त्वाची क्षमता आहे. ही क्षमता आपणास आपल्या समस्यांवर उपाय शोधण्यास उपयुक्त ठरते.

तर दुसरीकडे मानवाची वैज्ञानिक प्रगती आणि विज्ञानाच्या निर्माण केलेल्या सुविधांच्या चुकीच्या आणि अती वापरामुळे 'ग्लोबल वार्मिंग' सारखे संकट निर्माण झाले आहे. प्रदूषणामध्ये प्रचंड वाढ निर्माण झालेली आहे. प्लास्टिकच्या अतिवापरामुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. या अशा प्रकारच्या व हवामान बदलाच्या समस्यांवर एकमेव संभाव्य उपाय म्हणजे विज्ञान आणि वैज्ञानिक प्रगती हाच आहे. विज्ञान हे ज्ञानाचे आणि प्रगतीचे सर्वात महत्त्वाचे माध्यम आहे . वैज्ञानिक प्रगतीतच आपल्या समाजाच्या हितासाठी अनेक उपाय दडलेले आहेत. म्हणून आपण सर्वांनी विज्ञानाकडे संशोधक वृत्तीने, प्रगतीच्या दृष्टीने व विकासाच्या दृष्टीने पहिले पाहिजे व त्या दृष्टीने सर्वांनी कार्यरत राहणे आवश्यक आहे. सर्वांना, राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या खूप खूप शुभेच्छा......

**-प्रा. डॉ. विजय भोसले**
रसायनशास्त्र विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड
मो. ९४० ३०६ ७२ ५२

# धर्म आणि विज्ञान

अनादी काळापासून मानव अंतिम सत्याचा शोध घेत आहे. धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान इत्यादींच्या माध्यमातून अखंड अविरतपणे माणसाचा शोध चालू आहे.

मी कोण आहे? माझे खरे स्वरूप कोणते? या जगाची निर्मिती कोणी केली? मृत्यूनंतर जीवाचे अस्तित्व शिल्लक राहते की नाहीसे होते. बाह्यसृष्टीचे खरे स्वरूप काय? अशा गहन प्रश्नांचा विचार माणसाने सतत केलेला आहे. मानवाने केलेल्या कर्माचे दुःख कोणत्या उपायाने नाहीसे करता येईल, आणि सर्वश्रेष्ठ सुख कसे प्राप्त होईल, याविषयीचे विचारमंथनही सतत चाललेले आहे. मानवी संस्कृतीचा इतिहास व विविध धर्मग्रंथ, सांप्रदाय, पंथ, धर्मगुरू, संत महात्मे, तत्ववेते व शास्त्रज्ञ विश्वातील सत्य शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु काही धार्मिक क्षेत्रात अनेकांची भूमिका सत्यासाठी नसते तर आपल्या सांप्रदाय वगैरेने जे सांगितले आहे ते सत्य मानले जावे यासाठी त्यांचा आग्रह असतो. याचा अर्थ असा की, त्यांना सत्यापेक्षा अहंकार प्रिय असतो. सत्य खोडले गेले तर त्यांना खंत वाटणार नाही, पण सांप्रदाय खोडला तर ते कमालीचे बैचेन होतात. थोडक्यात सांगायचे म्हणजे धर्म आणि विज्ञान यांची सत्यशोधनाच्या बाबतीतील भूमिका नेमकी काय असते, त्यांची कामगिरी कशी चालते याविषयी थोडे विचार करू.

आपल्याला सुख मिळावे आणि आपल्या वाट्याला येणारे दुःख टाळावे ही प्रत्येक प्राणीमात्राची इच्छा असते. हे घडवून येण्यासाठी बाह्यसृष्टीला अनुकूल करून घेण्यासाठी धर्म आणि विज्ञान ही दोन साधने मानवाने वापरलेली आहेत. भूतकाळामध्ये धर्माचा वापर मोठ्या प्रमाणावर आणि विज्ञानाचा वापर अत्यल्प प्रमाणात झाला. गेल्या ३०० ते ४०० वर्षात मात्र विज्ञान अधिक प्रभावी झाले. युरोपमध्ये गॅलिलिओ, कोपर्निकस यासारखे शास्त्रज्ञ जन्मास आले. त्यांनी पृथ्वी सूर्याभोवती फिरते असा शोध लावला. त्यापूर्वी सूर्य पृथ्वीभोवती फिरतो असे मानले जात होते. लोकांच्या मनातील अज्ञान कोपर्णीकसने दूर केले. परंतु हा शोध लावताना एक त्रुटी राहून गेली. पृथ्वी सूर्याभोवती वर्तुळाकार फिरते असे त्याने सांगितले होते. त्याच्यानंतर केप्लर नावाच्या शास्त्रज्ञाने पृथ्वी सूर्याभोवती फिरत असली तरी ही वर्तुळाकार कक्षेतून फिरत नसून लंब वर्तुळाकार कक्षेतून फिरते असा शोध लावला. केप्लरच्या या शोधामुळेच पुढे न्यूटनला गतीशास्त्राचे आपले सिद्धांत मांडणे शक्य झाले. आता केप्लरच्या या कृतीकडे कोणत्या दृष्टीने पाहायचे, कारण धार्मिक दृष्टिकोनातून पाहिले तर आधीच्या महर्षीने सांगितलेल्या सत्यामध्ये त्रुटी दाखवण्याचा प्रयत्न म्हणजे पापच होईल. परंतु विज्ञान क्षेत्रात असे मानले जात नाही. केप्लरच्या शोधामुळे कोपर्णीकसचा आपमान तर झालाच नाही उलट कोपर्णीकसचे अपुरे स्वप्न पूर्ण केले असेच मानले जाते. परंतु त्यासाठी त्यांना धर्माचा खूप छळ सहन करावा लागला. भारतात मात्र अजूनही या दोहोत संघर्ष चालू आहे.

१) वैज्ञानिक पद्धत : सृष्टीमध्ये जे विविध पदार्थ आणि घटना असतात त्यांच्यामध्ये जे कार्य कारणासाठी काही संबंध असतात हे सबंध विशिष्ट नियमाने निश्चित झालेली असतात. हे सबंध मानवाला आपल्या बुद्धीचा उपयोग करून आणि निरीक्षण, प्रयोग इत्यादीच्या द्वारे जाणता येतात. त्यामध्ये त्रुटी व अपूर्णता असू शकते. आणि पुन्हा प्रयत्न करूनच तो दूर करता येते या ज्ञानाचा जोरावर आपण सृष्टीला अनुकूल करून घेऊ शकतो असं विज्ञान सांगते.

२) धर्म ज्ञान : प्राचीन काळातील एखाद्या पवित्र क्षणी एखाद्या महर्षीला प्राप्त झालेले ज्ञान हे पूर्णपणे निर्दोष असते आणि त्या मध्ये कोणत्याही प्रकारे बदल करण्याचा अधिकार कोणालाही नसतो. ही धार्मिक क्षेत्रात आढळणारी प्रवृत्ती आहे. हजारो वर्षांपूर्वी जो सिद्धांत सांगितलेला असतो तो पवित्र समजला जातो. त्याच्यात काना-मात्राही बदल करण्याचा कोणालाही अधिकार नसतो. त्यामुळे जुनाट, बुरसटलेल्या मूल्यांची चिकित्सा करून त्या जागी नव्या मूल्यांची चिकित्सा करण्याचा मार्गच शिल्लक राहत नाही. जुन्यात जर बदल कोणी केलाच तर सर्वज्ञ अशा प्राचीन ऋषीमुनींचा अपमान मानला जातो. त्यामुळे गुरुचे जे विचार तेच शिष्याचे विचार असे पिढ्यान् पिढ्या चालू आहे. हजारो वर्षापासून ज्ञान व प्रगतीचा जो बिंदू गाठला गेला त्या बिंदूपासून समाज एक कणभरही पुढे सरकला नाही. विज्ञानाच्या क्षेत्रात निरीक्षण, प्रयोग इत्यादी द्वारे ज्ञान मिळविले जाते. त्यामुळे कितीही श्रेष्ठ व्यक्तीने सांगितलेला सिद्धांत असला तरी चिकित्सा केल्याशिवाय त्याचा स्वीकार केला जात नाही. अशी भूमिका विज्ञानाची आहे तर धार्मिक क्षेत्रात मात्र चिकित्सा करण्याला पूर्णपणे मनाई असते. बाह्यसृष्टीतील पदार्थाचे ज्ञान प्राप्त करून त्या सृष्टीवर नियंत्रण प्रस्थापित करावयाचे असे विज्ञानाला वाटते, तर बाह्यसृष्टीतील प्रभावी पदार्थ या अतिमानवी शक्ती आहेत. अशी कल्पना करून त्यांना प्रसन्न करण्यासाठी शरणांगती पत्करायची आणि या मार्गाने त्या सृष्टीला अनुकूल करून घ्यायचे, असा धर्माचा प्रयत्न असतो. या शक्तीला अनुकूल करून घेण्यासाठी धर्म यज्ञ यागादीच्या कर्मकांडाचा उपयोग करतो. तर विज्ञान बाह्यसृष्टीला अनुकूल करून घेण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करतो.

धर्म आणि विज्ञान याचा इतिहास पाहिला असता सृष्टीतील असंख्य तत्त्वाचे आकलन विज्ञानाला जसे झाले तसे धर्माला झालेली नाही. ईश्वराने आपली रहस्य धर्माऐवजी विज्ञानालाच पुन्हा पुन्हा सांगितली. अनेक रोगांनी कुटुंबाच्या कुटुंबे उध्वस्त होत असताना धर्माने ईश्वराची आळवणी खूप केली धार्मिक कर्मकांडेही केली पण ईश्वराला धर्माविषयी चुकूनही पाझर फुटला नाही. याउलट विज्ञानाने अनेक रोगावर अनेक लस शोधून काढली व त्याचे फळ मात्र माणसाच्या पदरात पडले, धर्माच्या नाही. आता जर विज्ञान ईश्वरद्रोही असेल आणि धर्म ईश्वर भक्त असेल तर ईश्वराने हे असे का केले? याचे उत्तर कोणी देऊ शकेल काय? धर्म आणि विज्ञान ही दोन्हीही मानवी हिताची साधने आहेत असे जर कोणी म्हणेल तर ते चूक आहे. कारण मानवाला विज्ञानाने प्राप्त झालेल्या अगणित लाभांची धर्माला बरोबरी करता येणे शक्य नाही. कारण सत्याच्या बाबतीत धर्म अज्ञानांधकारातच वावरत असतो आणि विज्ञान सातत्याने ज्ञानाचा शोध घेत असते. देवीचा रोग, कर्करोग, करोना इत्यादी रोग दूर कसा करावा याचे वस्तुनिष्ठ ज्ञान नसेल तर धार्मिक पद्धतीच्या कितीही प्रार्थना व कर्मकांडी केली तरी रोग बरा होणार नाही. परंतु विज्ञान मात्र आत्मसंरक्षणाची गरज खऱ्याखुऱ्या अर्थाने भागवते शेकडो रोगावरील उपचार शस्त्रक्रिया इत्यादी वरून स्पष्ट झालेले आहे. म्हणूनच छत्रपती शिवरायांनी सतराव्या शतकात धर्म सुधारणा केली. धर्म हा रयतेसाठी आहे. रयत धर्मासाठी नाही. राजा हा कोणत्याही धर्माचार्यापेक्षा श्रेष्ठ आहे. रयतेची शोषण करणारी धर्म व्यवस्था नाकारण्याचा पूर्ण अधिकार रयतेस आहे. रयतेचे धर्माने नाकारलेले सर्वाधिकार उदा: शिक्षण, शास्त्र, विज्ञान, संपत्ती, संरक्षण यावरील सर्व बंदी छत्रपतींनी उठवल्या. राजसत्ता धर्म सत्तेपेक्षा श्रेष्ठ असल्याचे दाखवून दिले. भाकड कथा, अंधश्रद्धा, यज्ञ, धर्मपूजा यावर महाराजांचा विश्वास नव्हता. म्हणूनच महाराजांना स्वराज्य स्थापन करता आले. विज्ञान दिनाच्या खूप खूप शुभेच्छा!

जय ज्ञान! जय विज्ञान!!

**-शिवाजी कपाळे गोळेगावकर**
अध्यक्ष
नामदेव तुकाराम वारकरी परिषद, नांदेड
मो. ८००७१८९९८०

# ज्येष्ठ नागरिकांना अर्थसंकल्पीय अधिवेशनात न्याय द्या; नाही तर अन्न-पाणी त्यागाची परवानगी द्या-डॉ. हंसराज वैद्य

**नांदेड**-येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात ज्येष्ठ नागरिकांना न्याय द्या, नाही तर अन्न-पाणी त्यागाची परवानगी द्या, अशी मागणी सकळ ज्येष्ठ नागरिक व फेस्कॉमच्यावतीने डॉ. हंसराज वैद्य यांनी केली आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, ज्येष्ठ नागरिक समूह हा नोंदणीकृत, अनोंदणीकृत मिळून एकून मतदार संख्येच्या 'विस टक्के' आहे. अत्यंत पोक्त, अनुभव संपन्न, निःस्पृह तथा निर्मोही मतदार समूह आहे. त्यांच्या भरघोष मतदानामुळेच महायुतीचे शासन बनले आहे. ज्येष्ठ नागरिक समूहाने स्वातंत्र्य लढ्यापासून ते आजतागायत देश तथा राष्ट्र उभारणीत फार मोठा त्याग, योगदान तथा समर्पण केलेले आहे! देशाला त्यांनी विविध क्षेत्रात अनेक रत्न समर्पित करून देशाला समृद्ध केलेले आहे!

आजपर्यंत या समूहाचा राजकारणी, धूरिणांनी केवळ एक महा व्होट बँक म्हणूनच पाहिलेले आहे. बहुतांश हा मतदार समूह ग्रामीण व झोपडपट्टी भागात राहतो. हा मतदार समूह दुर्लक्षित, उपेक्षित तथा वंचित राहिलेला आहे!

ज्येष्ठ नागरिक सध्याला आर्थिकदृष्ट्या अत्यंत वाईट परिस्थितीत जीवन जगत आहे. वृद्धापकाळातील अनेक आजारांनी ते पीडित आहेत. त्यांच्या अंगातले त्राण गेलेले आहे. दिव्यांगत्वामुळे त्यांना कुणी काम व दामही देत नाही. त्याला भीकही मागता येत नाही. मुलांना व सुनांनाही ज्येष्ठ नागरिक आता ओझे झालेले आहेत. केव्हा एकदाचे ते मरतील व त्यांच्यापासून आपली सुटका होईल असे कुटूंबियांना झालेले आहे! केवळ मृत्यू येत नाही व विष प्राशन करून जीवन यात्रा संपवावी तर विष विकत घेण्यासही ज्येष्ठ नागरिकांकडे पैसा नाही! ते आता पूर्ते निर्धन व निराधार झालेले आहेत. जीवनास कंटाळले आहेत.

कुटूंब, समाज, लोकप्रतिनिधी, प्रशासन, तथा शासनही त्यांच्या प्रश्नांकडेकडे गांभिर्याने व सहानभूतीने पहात नाही अशा परिस्थितीत ते सापडलेले आहेत.


आजपर्यंत स्थानिक लोकप्रतिनिधींना, अनेक नेते, अनेक मंत्री, आजी-माजी मुख्यमंत्र्यांना, महामहीम राष्ट्रपतीजींना, पंतप्रधानांना, अर्थमंत्री महोदयांना, विरोधी पक्ष नेत्यांना अनेक वेळा निवेदने देऊन झाली आहेत. पंधरा पंधरा हजार ज्येष्ठ नागरिकांची उन्हा-तानात, चिखल-पावसात प्रलंबित प्रश्न सोडवून घेण्यासाठी व मानधन मागणी मोर्चे, धरणे अंदोलने करून झाली आहेत. तेंव्हा येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरी ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांकडे गांभिर्याने व सहानुभूतीने प्रश्न सोडवावित अशी सकळ ज्येष्ठ नागरिकांची व फेस्कॉमची मागणी आहे. अन्यथा २३ मार्चपासून गोदावरी तिरावर पंधरा ते वीस हजार ज्येष्ठ नागरिकांसह आमरण अन्न पाणी त्याग आंदोलनाशिवाय ज्येष्ठ नागरिकांना पर्यायच उरलेला नाही. त्यांच्या सर्व मागण्या पैकी किमान ज्येष्ठ नागरिक धोरण व ज्येष्ठांसाठींचे पारित कायदे तथा नियमांची तंत्तोतंत्त अंमलबजावणी, जागतिक ग्राह्य साठ वर्षाचीच वयोमर्यादा, मुख्यमंत्री लाडके ज्येष्ठ माय-बाप योजना, केवळ गरिब, गरजवंत, दुर्लक्षित, वंचित तथा उपेक्षितांनाच ५०००/- रू प्रतिमहा विना अट मानधन, प्रवास आरक्षण व प्रवास भाडे सूट, सर्व करमुक्ती, ज्येष्ठ महिलां व पुरूष समूहातून किमान एक-एकजन, विधान परिषद व राज्य सभेवर घेण्याची तरतूद, ज्येष्ठ नागरिकांना राष्ट्रीय संपत्ती म्हणून घोषणा करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# राष्ट्रीय विज्ञान दिन

संपूर्ण देशात आजचा दिवस हा राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी नोबेल पारितोषिक विजेते भारतीय शास्त्रज्ञ सर सी व्ही रामन यांनी रामन इफेक्ट हा वैशिष्टयपूर्ण शोधनिबंध जगासमोर सादर केला होता. त्या दिवसाचे औचित्य साधून हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात शास्त्रीय, शैक्षणिक, वैद्यकीय, तांत्रिक, संशोधन आणि सर्व महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, शास्त्रज्ञ, संशोधक हा दिवस उत्साहाने साजरा करतात.

भारतासाठी पहिले नोबेल पारितोषिक मिळवून देणारे जेष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न सर सी व्ही रामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ या दिवशी भौतिक शास्त्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण अशा प्रकाशाच्या विकीरणासंबंधी संशोधन करून त्याविषयीचा वैशिष्ट्यपूर्ण शोधनिबंध जागतिक पातळीवर सादर केला. त्यांच्या या शोध निबंधाला १९३० साली मान्यता मिळाली आणि त्याच वर्षी या संशोधनासाठी त्यांना नोबेल पुरस्कार जाहीर झाला. सी व्ही रामन हे नोबेल पारितोषिक मिळवणारे पहिले आशियाई शास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजेच १९८७ पासून २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान म्हणून साजरा म्हणून साजरा केला जातो.

रामन यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी मद्रास येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव चंद्रशेखर व्यंकट रामन असे होते. शालेय वयात रामन हे अत्यंत तल्लख बुद्धीचे होते. रामन यांनी ११ व्या वर्षीच शालेय शिक्षण पूर्ण केले. १५ व्या वर्षी ते इंग्रजी आणि विज्ञानामध्ये पदवीधर झाले तर १७ व्या वर्षी भौतिक शास्त्रात पदव्युत्तर शिक्षण मद्रासमध्ये उच्च श्रेणीमध्ये पूर्ण केले. त्यांनतर ते कोलकाता येथे डेप्युटी अकाउंटट जनरल पदावर रुजू झाले झाले पण या नोकरीत त्यांचे मन रमेना म्हणून त्यांनी कोलकाता येथे कमी पगारात भौतिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. प्राध्यापक




म्हणून अध्यापन करीत असतानाही त्यांनी आपले संशोधन सुरूच ठेवले. १९२१ मध्ये कोलकाता विद्यापीठाने त्यांना उच्च शिक्षणासाठी ब्रिटनला पाठवले. तिथे त्यांनी लंडनच्या रॉयल सोसायटीमध्ये भारतीय तंतुवाद्ये हा शोधनिबंध सादर केला.

पुढे १९३५ मध्ये भारतीय तंतुवाद्ये विशेष करून तबल्याचा नादनिर्मिती, तबल्याची पुडी, शाई, तरंगलांबी इत्यादींवर संशोधन केले. युरोपातून समुद्रमार्गे भारतात येत असताना आकाशातील निळा रंग पाहून त्यांना या रंगाविषयी कुतूहल जागृत झाले. आकाश निळ्या रंगाचेच का दिसते असा प्रश्न त्यांना पडला. त्यांचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी पाणी, बर्फ यामधून प्रकाशाचे विकिरण यावर संशोधन सुरू केले. या संशोधनातून त्यांना आकाशाच्या निळ्या रंगाचे उत्तर मिळाले. रामन इफेक्ट म्हणजे प्रकाशाचे विकिरणच. प्रकाशाचे विकिकरण हा एक दृश्य परिणाम आहे. अशा प्रकारचे किरण सरळ जेंव्हा आपल्या डोळ्यांत शिरतात, तेंव्हाच आपल्याला प्रकाशाच्या अस्तित्वाची जाणीव होते. रामन हे सुरवातीला स्फटिकांच्या अणू रचनेसंबंधी आढळणाऱ्या रचना साधर्म्याशी अपवादात्मक असा अभ्यास करत होते. या दरम्यान १९२८ साली त्यांना असे आढळून आले की विकिरीत प्रकाशामध्ये मूळ प्रकाशाइतक्या, तरंग लांबीच्या किरणांबरोबर इतरही प्रकाश किरणांचे अस्तित्व असते, ज्यांचा मागमूसही मूळ प्रकाश किरणांमध्ये नव्हता. या नवीन किरणांचा जास्त अचूक अभ्यास करण्यासाठी त्यांनी पाऱ्याच्या विद्युतदीपाघटापासून मिळणारी तरंग लांबी अभ्यासली आणि त्यातून त्यांच्या नवीन निष्कर्षाला, संशोधनाला बळकटी मिळाली.

प्रकाशामध्ये कण स्वरूपाशी साधर्म्य सांगणारे काही गुणधर्म असतात, त्यांच्या प्रकाश कनिकांमधील ऊर्जा ही त्या प्रकाशाच्या कंपन संख्येच्या समप्रमाणात असते. त्यांचा हाच शोधनिबंध रामन इफेक्ट म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यांच्या या अत्यंत मौलिक आणि आणि अनमोल अशा संशोधनामुळे पुढे अनेक शोध लागले. भौतिक शास्त्रात सध्या जे शोध लागत आहेत त्याचे मूळ याच रामन इफेक्ट मध्ये सामावलेले असते. रामन इफेक्टमुळे माहितीचे भांडार खुले झाले. त्यामुळेच देशातील देशातील १७ विद्यापीठांनी तसेच जगातील ८ विद्यापीठांनी त्यांना सन्मानीय डॉक्टरेट फेलोशिप बहाल केली. १९४३ मध्ये रामन यांनी बंगलोर येथे रामन संशोधन संस्थेची स्थापना केली. या संशोधन संस्थेत भौतिक शास्त्रातील संशोधनाला अग्रक्रम देण्यात आला. १९५४ साली भारत सरकारने भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. १९५७ साली आंतरराष्ट्रीय लेनिन पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली. आपण लावलेल्या शोधाचा उपयोग रचनात्मक कार्यासाठी व्हायला हवा विध्वंसक कार्यासाठी त्याचा उपयोग होऊ नये असे त्यांचे मत होते. १२ नोव्हेंबर १९७० रोजी त्यांचे निधन झाले.

**-श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

## थोडक्यात...

### आज पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने शुक्रवार २८ फेब्रुवारी रोजी यशवंत महाविद्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात नामांकित उद्योजक व इतर आस्थापनांच्यावतीने मुलाखती घेण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी २८ रोजी सकाळी १० वाजता यशवंत महाविद्यालय येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त रेणुका तम्मलवार यांनी केले आहे.

### ग्रामसंघांना अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– ग्रामीण भागात जलजीवन मिशनची अंमलबजावणी सुरू आहे. या अंतर्गत १ हजार ११५ गावांमध्ये सक्षम ग्रामसंघ निवडण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. निवड झालेल्या ग्रामसंघांना गावातील पाणीपुरवठा व्यवस्थापन, देखभाल-दुरुस्ती व समुदाय सहभागासाठी जबाबदारी देण्यात येईल. त्यांना दरमहा २ हजार रुपये मानधन मिळेल. अर्जांची तपासणी होऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली निवड केली जाईल. निवड झालेल्या ग्रामसंघांना विशेष प्रशिक्षण दिले जाईल. इच्छुक ग्रामसंघांनी अर्ज जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयात सादर करावेत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले व उपमुख्य कार्यकारी अधिकारी नारायण मिसाळ यांनी केले आहे.

# जुन्या वादातून खून करणाऱ्या दोघांना अटक; बारा तासात स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

## मंगळवारी वाय पॉईंटजवळ युवकाचे खुनाचे प्रकरण



**नांदेड (प्रतिनिधी)**– गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या अमोल भुजबळे या युवकाचा गणेशनगर वाय पॉईंटजवळ पूर्व वादातून त्याच्याच गावातील दोघांनी खंजरने भोसकून मंगळवारी (दि.२६) सकाळी साडेसातच्या सुमारास निर्घृण खून केला. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय रवी वाव्हुळे व त्यांच्या टीमने अवघ्या बारा तासात दोन्ही आरोपींना अटक करण्यात आले. शिवाजीनगर पोलिसांनी या दोघांनाही बुधवारी न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना सात दिवसांच्या पोलीस कोठडीत पाठवले आहे.

नांदेड शहराच्या खोब्रागडेनगर भागात राहणारा अमोल चांदु भुजबळे (वय ३२) याचे आणि त्याच गावातील गोपाळ निवृत्ती वाकोडे, निखिल भगवान वाकोडे व त्यांच्या अन्य सहकाऱ्यांसोबत अण्णाभाऊ साठे जयंती - २०२४ च्या मिरवणुकीत वाद झाला होता.

गोपाळ निवृत्ती वाकोडे (वय २९) आणि निखिल भगवान वाकोडे (वय २०) या दोघांनी संगणमत करून अन्य काही मित्रांची मदत घेऊन मंगळवारी (दि.२५) सकाळी साडेसातच्या सुमारास महात्मा फुले हायस्कूल गणेशनगर वाय पॉईंटजवळ अमोल भुजबळेवर प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्याचा थरार सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाला होता. घटनास्थळाला पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, शिवाजीनगर ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक शिवाजी गुरमे, सहाय्यक पोलीस निरीक्षक आश्रोबा घाटे यांनी भेट दिली होती.

या प्रकरणातील आरोपींना अवघ्या बारा तासाच्या आत स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे, पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड, माधव केंद्रे, बळीराम दासरे, अंमलदार गुंडेराव कर्ले, मिलिंद नरबाग, विश्वनाथ इंगळे, सखाराम नवघरे, तिरुपती तेलंग, बालाजी यादगीरवाड, राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे आणि सुधाकर देवकते यांनी मारेकरी गोपाळ वाकोडे आणि निखिल वाकोडे यांना परभणीतून अटक केली. त्यांच्याकडून दोन खंजर आणि दुचाकी जप्त केली आहे. तपासांती दोन्ही आरोपींना शिवाजीनगर पोलीस निरीक्षक जालिंदर तांदळे यांच्या स्वाधीन केले. पोलीस निरीक्षक तथा तपासीक अंमलदार शिवाजी गुरमे यांनी या दोघांनाही न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी दिली आहे.

## मध्य रेल्वे मधील लाईन ब्लॉकमुळे काही रेल्वेगाड्या रद्द

**नांदेड (प्रतिनिधी)**– छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक १२ आणि १३ च्या विस्तारीकरणामुळे मध्य रेल्वेने लाईन ब्लॉक घेतला आहे. यामुळे काही रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. तर काही रेल्वेगाड्या अंशतः रद्द केल्या आहेत.

गाडी क्रं. १७६१८ हजूर साहिब नांदेड छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई तपोवन एक्स्प्रेस दि.१ मार्च रोजी सुटणारी गाडी रद्द करण्यात आली आहे. गाडी क्रं. १७६१७ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई - हजूर साहिब नांदेड तपोवन एक्स्प्रेस दि.२ मार्च रोजी सुटणारी गाडी रद्द करण्यात आली आहे. गाडी क्रं. ११४०२ बल्लारशा - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई नंदीग्राम एक्स्प्रेस दि.२६, २७, २८ फेब्रुवारी आणि ०१ मार्च रोजी सुटणारी गाडी दादर पर्यंतच धावेल. दादर ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. गाडी क्रं. १७०५८ लिंगमपल्ली छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई देवगिरी एक्स्प्रेस दि.१ मार्च रोजी सुटणारी गाडी दादर पर्यंतच धावेल, दादर ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे.

## संगमेश्वर देवस्थानात भक्तांची गर्दी

### ट्रॅफिक जाम : दोन किलोमीटरची पायपीट करण्याची वेळ



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)**– येथील शहरापासून १० किमी अंतरावर असलेल्या संगम येथे महाशिवरात्री निमित्त संगमेश्वर देवस्थानचे दर्शन घेण्यासाठी त्रिवेणी संगम नदी पात्रात पवित्र स्नान करण्यासाठी शिवभक्तांनी मोठी गर्दी केली आहे.

संगम येथील संगमेश्वर देवस्थान हे दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध आहे. बुधवारी प्रयागराज येथील महाकुंभ मेळाव्याच्या पवित्र स्नानचा शेवटचा दिवस असल्यामुळे संगमेश्वर देवस्थान येथेही मांजरा व गोदावरी नदीचे त्रिवेणी संगम असल्यामुळे या पवित्र नदीत स्नान व संगमेश्वराचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. त्यामुळे दोन किलोमीटर पर्यंत रस्त्यावर ट्रॅफिक जाम झाल्याचे चित्र दिसून आले. भाविकांना उन्हात पायपीट करावी लागली. यावेळी संगमेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या हस्ते अभिषेक व महापूजा करण्यात आले. तर ट्रस्टीकडून भाविकांना फळे, व साबुदाणाचे वाटप करून पोलिसांचा सत्कार करण्यात आला. गुरुवारी २७ रोजी संगमेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी मार्केट कमिटीचे सभापती बाबाराव भाले, संचालक आनंदराव शिंदे, संगमनाथ माली पाटील संगम, ओम भाले, मारोती दगडे व ट्रस्टचे अनेक पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले आहे. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दल कर्मचारी व पोलीस पाटील यांनी कडक बंदोबस्त ठेवला.

## महाशिवरात्री निमित्त गोपाळ चावडी येथील श्री. गुरू विठ्ठलनाथ महाराज देवस्थानात भाविकांची गर्दी



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – महाशिवरात्री निमित्त गोपाळ चावडी येथील श्री गुरु विठ्ठलनाथ महाराज देवस्थानात २१ फेब्रुवारीपासून अखंड दत्तनाम सप्ताह सुरु आहे. या सप्ताहाचा शुक्रवारी दि. २८ रोजी समारोप होणार आहे.

श्री समगिरीजी गुरूजयगिरीजी महाराज यांच्या हस्ते महापुजा करण्यात आली. २७ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता त्रिभुज बबुत्रा व श्री गुरु विठ्ठलनाथ महाराज यांच्या समाधीचा महाअभिषेक श्री समाधान महाराज यांच्या हस्ते झाला. यावेळी माजी जि.प. सदस्य गंगाप्रसाद काकडे, मनोहर शिंदे, माजी उपमहापौर विनय गिरडे, उपसरपंच साहेबराव सेलुकर, सरपंच सौ. सुरेखा प्रदीप लाखे, दलीत मित्र माधव अंबटवार, श्रीमती गिरजा बाई तुळशिराम डाकोरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दर्शन घेतले.

दुपारी ३ वाजता महाप्रसाद रात्री ठीक ७ वाजता गुरु विठ्ठलनाथ महाराज यांच्या पादुका पालखी गावातील प्रमुख रस्त्याने काढण्यात आली. पालखीच्या मार्गावर ठिकठिकाणी गावकऱ्यांनी पालखीचे पूजन करून पालखीचे दर्शन घेतले. रात्री ८ वाजता द. आनंद दत कृपा भजनी मंडळ आलेगाव, ह.भ.प. बबलू पाटील वर्तळे व गुरुकृपा भजनी मंडळ सरेगाव तालुका मुखेड, हभप एकनाथ पाटील गिरे यांचे भजन होणार आहे. शुक्रवारी २८ फेब्रुवारी रोजी पहाटे पाच वाजता काकडा आरती होऊन अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजक व मुख्य पुजारी श्री समाधान तुळशीराम महाराज डाकोरे व गावकरी मंडळी गोपाळचावडी हे परिश्रम घेत आहेत.

## कोर्ट निकाल देईल तेव्हा देईल: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आयोगाने घ्याव्यात –ॲड. प्रकाश आंबेडकर

**नांदेड (प्रतिनिधी)** – कोर्टाला जेंव्हा निकाल द्यायचं तेंव्हा ते देतील. निवडणुका झाल्या पाहिजेत. त्या घेतल्या पाहिजेत आणि त्या घेण्याची जबाबदारी हे राज्याच्या निवडणूक आयोगावर आहे. त्यांनी याबाबतीत पुढाकार घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्याव्यात, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे.

ॲड. प्रकाश आंबेडकर मंगळवार दि. २६ फेब्रुवारी रोजी नांदेडला आले होते. त्यावेळी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, दुर्दैवाने मी असे म्हणेल की त्यांनी इलेक्शन नाही घेतले तर



त्यांच्यावर काय कारवाई व्हावी याची कुठंच तरतुद नाही. म्हणून आम्ही पिटीशन दाखल केले की यांनी जर योग्य वेळेस इलेक्शन घेतले नाही तर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. दुर्दैव असे म्हणेल की लॉर्डशिप कुलकर्णी यांच्याकडे ते हेरिंगला गेले आणि त्यांनी ते खारीज केले. खारीज केल्यानंतर मार्ग काहीच नाही.

**देशमुख कुटुंबाने योग्य वकील सुचवला**

देशमुख कुटुंबियांना पाहिजे तो वकील निवडला पाहिजे आणि शासनाला कळवलं पाहिजे. मग आम्हाला शासनाला बोलता येईल. शासकीय वकील तुम्ही देऊ नका. देशमुख कुटुंबीयांनी उज्वल निकम यांची मागणी केली असेल तर ती योग्य आहे. पण त्यांनी मागणी केली हे मला माहीत नव्हतं, असे वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले. सध्या देशापुढे दोन्ही बाजूने संकट आहे. एक व्यवस्थेने दिलेली सुरक्षितता काढण्याचा भाग सुरु आहे आणि दुसरं राज्य आणि केंद्रात सत्तेत बसलेले म्हणत आहेत आम्ही या देशाच संविधान बदलू. तुमचं राहील काय? आरक्षण विरोधात काँग्रेस, शरद पवार यांची राष्ट्रवादी तर भाजप आरएसएस हे विरोधी आहेत. त्यागाची भूमिका करायची असेल तर आमचे मत आता त्यांना नाही. हे निश्चय झाला पाहिजे. फुले- शाहू- आंबेडकरी जनता पैश्याने विकली जात आहे. फुले- शाहू- आंबेडकर यांच्या विचारांची मशाल फडफडणाऱ्या दिल्यासारखी झाल्याच दिसत आहे. ज्या दिवशी ही मशाल पुन्हा पेटलेली दिसेल तेव्हा संविधान बदलणारे तुमच्याकडे गीडगीडत बोलतील. ही ताकद पुन्हा उभी करा असे आवाहन आंबेडकर यांनी केले आहे.

## जगद्गुरु शंकराचार्य द्वारकापीठ यांचे हाळदा येथे तीन दिवस दीक्षा, दर्शन व आशिर्वचन कार्यक्रम

### १ मार्च ते ३ मार्च, तीन दिवसीय सोहळ्याचे आयोजन



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – जगद्गुरु शंकराचार्य द्वारकापीठ स्वामीत्वाचे पंचपीठम् यांचे सिध्दतिर्थधाम (हाळदा) येथे यांचे परम पावन आगमन होणार आहे. त्यांच्या दर्शन, दीक्षा व आशिर्वचनाचा कार्यक्रम एक दोन व तीन मार्च रोजी कार्यक्रम होणार आहेत. समस्त सनातनी हिंदू बांधवांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन हळदा मठाचे महंत श्री विशुद्धानंद महाराज यांनी केले आहे.

हाळदा (ता.कंधार) येथे दरवर्षी प्रमाणे साजऱ्या होणाऱ्या मुख्य वार्षिक यात्रे निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवासाठीअनंत श्री विभूषित सामवेदीय पश्चिमाम्नाय द्वारका शारदा पिठाधिश्वर श्रीमज्ज जगद्गुरु शंकराचार्य स्वामी श्री सदानंद सरस्वती जी महाराज श्री शारदामठ, द्वारका यांच्या प्रथम आगमन सोहळा साजरा करण्यात येत आहे. या निमित्त हाळदा नगरीत कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येत आहे. या निमित्त स्वागत सोहळा आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री जगद्गुरू महाराज यांच्या कार्यक्रमांची रुपरेषा अशी आहे. दि.१ मार्च रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत पादुका पूजन व दर्शन, दि. दोन मार्च रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत दीक्षा व दर्शन व दुपारी २ ते ६ वेळेत दर्शन व आशिर्वचन कार्यक्रम होणार आहे. दि. ३ मार्च रोजी सकाळी ७ ते १० दिक्षा, दर्शन व आशिर्वचन होणार आहे. नांदेड जिल्हा पंचक्रोशीतील भक्त गणांनी या कार्यक्रमासाठी उपस्थिती लावून दर्शन व आशीर्वचंन सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे स्वामी विशुद्धानंद महाराज सिद्धतीर्थ धाम हाळदा यांनी केले आहे.

## आर. आर. मठदेवरु यांचे रस्ता अपघातात निधन

**देगलूर (प्रतिनिधी)** – मोघा मंडळ मदनुर येथील मूळ रहिवासी व सध्या साधनानगर मध्ये वास्तव्यास असणारे सेवानिवृत्त मुख्याध्यापक रेवनआप्पा रामलिंगआप्पा मठदेवरु यांचे पुणे-सोलापूर महामार्गावर भिगवनजवळ कार अपघातात बुधवारी (दि.२६) पहाटे निधन झाले.

मठदेवरु पुणे येथील मुलाला भेटण्यासाठी सोमवारी पुणे येथे गेले होते. तेथून परत देगलूरकडे येत असताना त्यांच्या कारला एका ट्रकने समोरासमोर जोराची धडक दिली. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. श्रीराम शिक्षक सहकारी पतसंस्थेचे ते माजी चेअरमन होते. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नरंगल येथे पदोन्नत मुख्याध्यापक म्हणून जून २०२४ मध्ये सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुले, एक मुलगी, जावई, नातू, पणतू असा परिवार आहे. सायंकाळी मोघा येथील त्यांच्या शेतात त्यांच्यावर अंतिमसंस्कार करण्यात आले. सहशिक्षिका चंद्रकला मठदेवरु यांचे ते पती होत.



**अर्धापूर (प्रतिनिधी)** – आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी अर्धापूर येथील ग्रामीण रुग्णालयात आरोग्य समिती सदस्य पंडितराव लंगडे यांच्या निवासस्थानी भेट दिली असता त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, प्रदेश सदस्य धर्मराज देशमुख, डॉ. विशाल लंगडे, गटनेते बाबुराव लंगडे, बंडू वाडेवाले, पंचायत राज तालुकाध्यक्ष तुळशीराम बंडाळे, पंडितराव शेटे, डॉ.राहूल लंगडे, साईनाथ लंगडे, गोविंद लंगडे आदी उपस्थित होते.

## बुद्धगया येथील मुक्ती लढ्याच्या समर्थनार्थ नांदेड शहरात निदर्शने



**नांदेड (प्रतिनिधी)** – बिहारच्या बुद्धगया येथील बुद्धविहार मुक्तीच्या आंदोलनास नांदेड येथे निदर्शने आंदोलन करून पाठींबा देण्यात आला.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर श्याम निलंगेकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या आंदोलनात यशवंत थोरात, डी. पी. गायकवाड, काकासाहेब डावरे, सुभाष काटकांबळे, चंद्रमुनी मांजरमकर, दीपक पवळे, आकाश चव्हाण, अशोक कोलते, दीपक शिराढोणकर, सम्यक खोसले, राजू लोणे, दिगंबर हनुमंते, योगेश सोनाळे, भय्यासाहेब पवार, मधुकर सोनकांबळे, व्ही. पी. वाघमारे, एन. जे. गायकवाड, गोविंद कांबळे, गुणवंतराव कोकरे, भिमराव हैंबते, अतिश भोसले, विक्रांत बिऱ्हाडे यांच्यासह आदींनी निदर्शने आंदोलनात सहभाग घेतला. राष्ट्रपती यांना निवासी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. या शिष्टमंडळात रोहन कहाळेकर, भन्ते विनयबोधी, प्रा. बाबाराव नरवाडे, भिम आर्मीचे किरण सदावर्ते, भिम प्रहारचे प्रकाश वाघमारे यांचा समावेश होता.

## महाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी काळेश्वर येथे अलोट गर्दी



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– महाशिवरात्री निमित्त बुधवारी मध्यरात्री पासून दिवसभर तीर्थक्षेत्र काळेश्वर मंदिरात लाखो भाविकांनी दर्शन घेतले. भाविकांसाठी संस्थानच्या वतीने चोख व्यवस्था करण्यासाठी आली होती.

महाशिवरात्री निमीत्त श्री क्षेत्र काळेश्वर मंदिर, विष्णुपुरी येथे २६ फेब्रुवारी रोजी महाअभिषेक, नोंदणी पध्दतीने महाअभिषेक, महाआरती, भजन संध्या यासह मंदिर परिसरात २० ते २७ फेब्रुवारी दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व शिवलिलामृत पारायण सोहळा पार पडला.

बुधवारी रात्री १२ वाजता पुजारी सतिश महाराज, शिवलिंग धनमणे, अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, काळेश्वर मंदिर संस्थान व विश्वस्त समिती यांच्या हस्ते श्री काळेश्वर भगवानचा महाअभिषेक, तसेच नोंदणी पद्धतीने अभिषेक करण्यात आले.

भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी ठिकठिकाणी वाहन पार्किंग, चहा फराळ, फळे, पाणपोई व्यवस्था करण्यात आली. माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, आमदार सुजया चव्हाण व जया चव्हाण, भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, धारोजी हंबर्डे यांच्या सह विष्णुपुरी ग्रामपंचायत सरपंच सौ संध्या विलास हंबर्डे, उपसरपंच अर्चना विश्वनाथ हंबर्डे व ग्राम पंचायत सदस्य, सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर पदाधिकारी यांनी दर्शन घेतले. रात्री संगीत भजन संध्या झाली.

जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशानुसार ग्रामीण पोलीस उपविभागीय अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या आदेशानुसार ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी बारा अधिकारी, पन्नास पुरुष महिला पोलीस कर्मचारी, पुरूष महिला होमगार्ड यांच्या कडेकोट पोलीस बंदोबस्त, नदीकाठ किनारावर जिवरक्षक दल तैनात करण्यात आले होते.

विष्णुपुरी मुख्य मार्गावर शहर वाहतूक शाखा, पोलीस अंमलदार, होमगार्ड यांच्या अनेक ठिकाणी बंदोबस्त व पार्किंग व्यवस्था केल्याने भाविक भक्तांना दर्शन सुलभ झाले, महाशिवरात्री निमित्ताने ग्रामीण व शहरी भागातील विविध खेळणी, महाप्रसाद यासह दुकाने थाटली होती. तसेच आकाश पाळणे दुकाने लावण्यात आली होती.

## जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतपेढी कार्यालयात संत गाडगेबाबा जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हा परिषद शिक्षक पेढीच्या कार्यालयात राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी त्यांच्या प्रतिमेचे पूजन सुभाष पानपट्टे, चेअरमन पांचाळी शिक्षक पतसंस्था कंधार/लोहा तथा केंद्रप्रमुख कापशी ता. लोहा यांच्या हस्ते करण्यात आले.

'गोपाळा गोपाळा देवकीनंदन गोपाळा, सांभाळ तुझ्या लेकरांना पुण्य समजती पापाला', असा अर्थपूर्ण संदेश देऊन खऱ्या अर्थाने बहुजन गोरगरीब समाजाला अज्ञानाच्या अंधकारातून बाहेर काढणारे राष्ट्रसंत गाडगेबाबांना प्रणाम करून वंदन करण्यात आले.

यावेळी सुहास मुळे, सुभाष चव्हाण, तेलंगे, सोनकांबळे आणि पतसंस्थेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याबद्दल सर्व मान्यवरांचे चेअरमन अशोक पाटील यांनी आभार मानले.

# युवा

व्हॅलेंटाइन्स विक स्पेशल

## ब्रेकअपच्या वेदनेतून पडा बाहेर


**काही लोक ब्रेकअप झाल्यावरही एक्सच्या आठवणी विसरू शकत नाहीत. त्यामुळे ते एकाच व्यक्तीला पुन्हा पुन्हा कॉल करतात. अनेक मेसेज टाकतात. ज्या ठिकाणी भेटायचे त्या ठिकाणी जातात. सोशल मीडियावर स्टेटस पोस्ट करतात आणि चेक करतात त्याने पाहिले की नाही. तुम्हीही असं काही करत असाल तर थांबा. यातून ब्रेकअपच्या वेदनेतून बाहेर पडण्याची संधी तुम्हाला मिळणार नाही. ब्रेकअप झाल्यानंतर त्यांच्याशी संपर्क न ठेवणे चांगले...**

- एक्सला भेटण्याचा प्रयत्न करू नका : काही लोक ब्रेकअप झाल्यावरही एक्सच्या आठवणी विसरू शकत नाहीत. म्हणून ते पुन्हा पुन्हा कॉल करतात, अनेक मेसेज टाकतात, ज्या ठिकाणी भेटायचे त्या ठिकाणी जातात, सोशल मीडियावर स्टेटस पोस्ट करतात आणि चेक करतात तिने पाहिले की नाही. तुम्हीही असं काही करत असाल तर थांबा. यातून ब्रेकअपच्या वेदनेतून बाहेर पडण्याची संधी तुम्हाला मिळणार नाही. ब्रेकअप झाल्यानंतर त्यांच्याशी संपर्क न ठेवणे चांगले.
- त्या व्यक्तीबद्दल बोलणे टाळा : काही लोक ब्रेकअपनंतरही आपल्या एक्सचा नावाचा सतत उल्लेख करतात. हे अधूनमधून घडले तर काही फरक पडत नाही. परंतु जर ते वारंवार घडत असेल तर याचा अर्थ असा आहे की तुम्ही अजूनही त्या व्यक्तीला विसरू शकलेले नाही आहात. अशा परिस्थितीत, आपण त्यांच्याबद्दल बोलणे टाळणे महत्वाचे आहे आणि त्यांच्याबद्दल चर्चा होत असेल तर तिथे थांबूच नका.
- जवळच्या व्यक्तीसोबत मनातले दुःख शेअर करा : ब्रेकअपनंतर वेदना होणे स्वाभाविक आहे. तुमचे दुःख तुमच्या मित्र आणि कुटुंबियांसोबत शेअर करा. तुम्हाला रडावेसे वाटत असले तरी, त्यांना मिठी मारून रडा आणि मोकळे व्हा. यामुळे तुमच्या मनावरील ओझे कमी होते आणि तुम्हाला शांती मिळते. पण यासोबतच तुम्हाला स्वतःला खात्री करून द्यावी लागेल की तुम्ही आता ब्रेकअपचा विचार करून पुन्हा कधीही रडणार नाही.
- वास्तव स्वीकारा आणि मूव्ह ऑन व्हा : जोपर्यंत एखादा व्यक्ती आताची परिस्थिती आणि सत्य स्वीकारत नाही तोपर्यंत तो व्यक्ती कोणत्याही गोष्टीपासून मूव्ह ऑन होऊ शकत नाही. जर तुमचे ब्रेकअप झाले असेल, तर लवकरच ते मान्य करा आणि ती व्यक्ती तुमच्यासाठी नव्हतीच असे समजून आयुष्य जगा.



### आवडत्या छंदात गुंतवून घ्या

एक दुःख विसरण्यासाठी दुसरं सुख निर्माण करावं लागतं आणि मग सुखाची एक एक पायरी चढताना सारं काही मागे राहतं. ब्रेकअपचं दुःख किंवा एखाद्या व्यक्तीला विसरण्यासाठी कोणत्याही आवडत्या कामात स्वतःला गुंतवून घ्या, एखादं असं स्वप्न पूर्ण करायला घ्या जे करण्याची तुमची फार पूर्वीपासून इच्छा होती, वेळ वाया न घालवता स्वतःला फिलिंग देण्यासाठी वापरा. वेळ लागेल पण तो दिवस नक्की उजाडेल जेव्हा इतर कोणापेक्षाही तुम्हाला स्वतःवर प्रेम जडेल. तो व्यक्ती मग समोरून गेला तरीही तुम्हाला काहीच फरक पडणार नाही.



## ...तर कधीच नाराज होणार नाही प्रेयसी!

**जर तुम्ही तुमच्या लेडी पार्टनरला समजून घेत नसाल तर त्यांच्यासाठी काहीही केलं तरीही तिला तुम्ही कधीच खुश करू शकत नाही. कारण तुम्हाला चांगल्या वाटणाऱ्या सगळ्याच गोष्टी त्यांना आनंदी ठेवण्यासाठी पुरेशा नाहीत. उलट त्यांना हव्या असलेल्या गोष्टीच केलेल्या उत्तम! स्त्रियांना नेमके काय आवडते आणि काय आनंदी ठेवते हेच माहीत नसल्याने जे पुरुष आपल्या लेडी पार्टनरला आनंदी ठेवू इच्छितात तेदेखील अपयशी ठरतात. कारण त्यांच्या लेडी पार्टनरला काय आवडते हेच त्यांना माहीत नसते. असं म्हणतात घरातील स्त्री मग ती कोणीही असो बायको, आई, मुलगी, बहीण.. ती जर खुश असेल तर घरात लक्ष्मी नांदते. त्यामुळे वेळात वेळ काढून त्यांना खुश करण्यासाठी लहानसहान प्रयत्न करा. बहुतेक पुरुषांना फार इच्छा असते पण नेमकं काय करावं हेच समजत नसतं ज्यामुळे ते सतत या परीक्षेत फेल होतात. अशा पुरुषांसाठी ५ गोष्टी दुग्धशर्करा योग ठरतील...**

- मदत करणे : जेव्हा तुम्ही रिलेशनशिपमध्ये असता तेव्हा कोणतेही काम केवळ तुमच्या पार्टनरवर ढकलू नका. कामाचा आवाका पाहून किंवा कधी मनापासून जर तुम्ही तुमच्या लेडी पार्टनरला तिच्या कामात थोडीशी मदत केली तर ती नेहमी आनंदी राहू शकते.
- उघडपणे प्रेम व्यक्त करा : बरेच पुरुष त्यांच्या पार्टनरवर राग उघडपणे व्यक्त करतात. मात्र प्रेम आणि कौतुक व्यक्त करण्यास मात्र लाजतात. अशा गोष्टी बोलून दाखवत नाहीत. तुम्हीही ही चूक करत असाल तर वेळीच सुधारा. कारण हा एक मार्ग आहे ज्याद्वारे तुम्ही तुमच्या पत्नीला किंवा गर्लफ्रेंडला नात्यात नेहमी संतुष्ट करू शकता.
- एकत्र क्वालिटी टाईम घालवा : तुम्ही एकाच घरात राहत असलात तरी तुमच्या जोडीदारासोबत एकांतात वेळ घालवण्यासाठी वेळ शोधा. त्यांचा दिवस कसा होता ते जाणून घ्या आणि त्यांच्या समस्या आणि चिंता समजून घ्या. ही एक गोष्ट तुमच्या नात्याची बाँडिंग घट्ट करते.
- तोंडभरून कौतुक करा : बायकोच नाही तर जगातील प्रत्येक स्त्रीला नवऱ्याने किंवा तिच्या आवडत्या पुरुषाने कौतुक केलेलं, तिच्या प्रत्येक लहानसहान गोष्टीची स्तुती केलेली प्रचंड आवडते. नेमकं काही पुरुषांना हेच जमत नाही आणि महिला दुसऱ्या एखाद्या गोड गोड बोलणाऱ्या अन् सतत स्तुती करत राहणाऱ्या पुरुषाकडे आकर्षित होतात. म्हणून सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत निदान बायकोच्या एका तरी कामाची स्तुती किंवा कौतुक नक्की करा.

### करिअरमध्ये पुढे नेणारा...

लग्न झालं तरीही आताच्या जगातील स्त्रिया कशातच कमी नाहीत. त्यामुळे प्रत्येक स्त्रीला आपली स्वतःची एक ओळख हवी असते. कधी कधी इच्छा असते पण मार्ग सापडत नसतो किंवा घरातून हवा तसा सपोर्ट मिळत नसतो. म्हणूनच आपल्या बायकोची ढाल बना.. तिला करिअरमध्ये पुढे जाण्यासाठी सल्ला द्या. वेळेप्रसंगी तिच्यासोबत धावाधाव करा किंवा तिला संधी शोधण्यासाठी मदत करा. यामुळे तिला विश्वास पटेल की आपला जोडीदार आपल्या यशाचाही भागीदार आहे.

### नजरेत मोठं करणारा...

लग्न करून आल्यानंतर सासरचं घर आणि त्या घरातील माणसं त्या मुलीसाठी अनोळखी असतात. अशावेळी गैरसमज, मतभेद आणि दुरावा निर्माण होऊ शकतो. पण नवऱ्याने सजगता दाखवून आई-वडिलांना पटवून दिलं की त्यांची सून किती चांगली आहे आणि ती घराच्या भल्यासाठी किती झटते आहे अर्थात तिची बाजू मांडली तर तिलाही नात्याविषयी प्रेम, ओढ, गर्व वाटू लागतो आणि दिवसेंदिवस काहीही मेहनत न घेता नातं अधिकच बहरत जातं. म्हणून घरात बायकोचं स्थान आणि आदर टिकवून ठेवण्यासाठी कायम प्रतत्नशील राहा.

## कणभरही नाही विश्वास, मग करायचं काय?

**पती-पत्नीमध्ये विश्वास प्रस्थापित करण्यासाठी मुक्त संवाद अत्यंत आवश्यक आहे. तुमचे विचार, भावना आणि चिंता तुमच्या जोडीदारासोबत शेअर करा. तुमच्या जोडीदाराचे काय म्हणणे आहे ते काळजीपूर्वक ऐका आणि त्यांच्या भावना समजून घ्या. तसेच, तुमच्या भावना आणि चिंता त्यांच्याशी शक्य तितक्या शेअर करा. जेव्हा पती- पत्नीच्या नात्यात विश्वासाचा अभाव असतो तेव्हा त्यांच्यात मतभेद निर्माण होतात आणि हळूहळू नातं तुटतं. पती- पत्नीमधील विश्वासच त्यांचे नाते अनेक वर्षे टिकवून ठेवू शकतो. पण कधीकधी वाईट अनुभवांमुळे लोक कोणावरही पटकन विश्वास ठेवू शकत नाहीत. जेव्हा तुमचा पार्टनर फसवतो तेव्हा त्याच्यावर अथवा तिच्यावर विश्वास ठेवणे कठीण होते.**

- मोकळेपणाने बोला : पती-पत्नीमध्ये विश्वास प्रस्थापित करण्यासाठी मुक्त संवाद अत्यंत आवश्यक आहे. तुमचे विचार, भावना आणि चिंता तुमच्या जोडीदारासोबत शेअर करा. तुमच्या जोडीदाराचे काय म्हणणे आहे ते काळजीपूर्वक ऐका आणि त्यांच्या भावना समजून घ्या. तसेच, तुमच्या भावना आणि चिंता त्यांच्याशी शक्य तितक्या शेअर करा.
- विश्वास न ठेवण्याचे कारण जाणून घ्या : जर तुमच्या जोडीदाराचा तुमच्यावर विश्वास नसेल तर त्यामागे काहीतरी कारण असावे. अशा परिस्थितीत तो तुमच्यावर विश्वास का ठेवत नाही हे जाणून घेण्यासाठी त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न करा. यामागे तुमच्याकडून झालेली चूक किंवा त्यांच्या भूतकाळात घडलेली काही घटना आहे का? हे जाणून घेतल्यावरच तुम्ही योग्य दिशेने प्रयत्न करू शकाल.
- कमिटमेंट सिरीयसली घ्या : एक विश्वासू व्यक्ती अशी आहे आपली वचनबद्धता म्हणजेच कमीटमेंट गांभीर्याने घेते. अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या जोडीदाराला दिलेले वचन पूर्ण करण्याचा प्रयत्न करा, मग ते वचन कितीही लहान असो वा मोठे. जर तुम्ही त्यांना ठराविक वेळेच्या आत काही काम करण्याचे आश्वासन दिले असेल, तर वेळ संपण्यापूर्वी ते पूर्ण करा.
- गोष्टी लपवू नका : पती-पत्नीच्या नात्यात पारदर्शकता असणे अत्यंत गरजेचे आहे. जेव्हा तुमचा पार्टनर तुमच्यावर विश्वास ठेवत नाही तेव्हा गोष्टी लपवणे विशेषतः धोकादायक असते. अशा परिस्थितीत जोडीदारासोबत प्रत्येक लहान-मोठी गोष्ट शेअर करा. तुमच्या हेतूंबद्दल त्यांच्या मनात कधीही प्रश्न उद्भवू नयेत यासाठी प्रयत्न करा. जेव्हा आवश्यक असेल तेव्हा त्यांचे गैरसमज नक्की दूर करा.



### एकदा केलेली चूक पुन्हा करू नका

एखाद्या व्यक्तीचा आपल्यावरून विश्वास का उडतो..? तर त्याला कुठेतरी आपणच कारणीभूत असतो. आपल्याकडून भूतकाळात कळत नकळत अशी काहीतरी चूक घडलेली असते ज्यामुळे पार्टनरचा विश्वास पार उडालेला असतो. अशावेळी जर पुन्हा नात्यात रंगत आणायची असेल आणि नावावरचा डाग पुसून काढायचा असेल तर सर्वात आधी तर आधी केलेली चूक पुन्हा करू नका. हळूहळू त्याला समजेल की आपण बदललो आहोत आणि विश्वास जिंकण्यात पुन्हा यशस्वी होऊ.



## तिशीत असूनही या मुलींना का लग्नाचा तिटकारा?

**वयाच्या तिशीपर्यंत सिंगल राहणे आपल्या समाजात आजही मान्य नाही. त्यातल्या त्यात जर स्त्रिया अशा राहत असतील तर मग विषयच संपला! अशा स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा खास करून रूढीवादी व्यक्तींचा दृष्टीकोन वेगळा असतो. त्यांना वाटते स्त्रीने तिशीच्या आताच आपला संसार सुरू करावा आणि पोरं बाळ जन्माला घालून प्रपंच सांभाळावा. पण आजच्या पिढीला हे मान्य नाही. आजच्या स्त्रिया शिक्षण आणि करियर याला महत्त्व देणाऱ्या आहेत. त्यामुळे कधी कधी तिशीत आल्यावर सुद्धा त्यांना प्रेमाचा गंध नसतो. त्या आपल्या ध्येयाकडे धावत असतात. पण त्या मागे जाता जाता त्यांना अनेकदा कटू बोल सुद्धा ऐकावे लागतात. चला जाणून घेऊया तिशीतल्या त्या स्त्रियांचे अनुभव ज्या आजही सिंगल आहेत. (गोपनीयतेच्या कारणामुळे आम्ही व्यक्तीची ओळख उघड करत नाही.)**

- माझ्यासाठी करीयर महत्त्वाचे : मी नेहमीच माझ्या करियर बाबत फोकस्ड राहिली आहे. मी कधीच डेटिंग रिलेशनशिप याबद्दल फार विचार केला नाही. किंबहुना मला विचार करायचा वेळच मिळाला नाही. मी काही ध्येये ठरवली होती आणि ती मिळवण्यासाठी मी दिवस रात्र मेहनत केली आणि अजून करते आहे. या काळात अनेक पुरूषांशी ओळख सुद्धा झाली. पण कामाच्या गर्दीत मला प्रेम सापडलं नाही. मात्र मी दुःखी नाही कारण माझ्यासाठी करीयरच महत्त्वाचे आहे.



- मी सिंगल राहायचं ठरवलं : मी वयाच्या विशीमध्ये काही लोकांना डेट करण्याचा प्रयत्न केला. माझ्यासाठी योग्य जोडीदार कसा असेल याचा शोध घेतला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. शेवटी मग मी सिंगलच राहायचं ठरवलं. आता मी तिशी पार केली आहे. माझ्या आयुष्यात कमिटेड व्यक्ती कोणी नाही. मी एक फ्री बर्ड आहे, जिच्यावर कोणाचं नियंत्रण नाही आणि मला हे आयुष्य आवडतंय.
- मला डेट करायला भीती वाटते : मला सोशल एनक्झायटी आहे. मी फार लोकांशी बोलू शकत नाही किंवा नव्या व्यक्तींशी ओळख वाढवायला मला भीती वाटते. त्यामुळे प्रेम आणि डेटिंग या गोष्टी तर माझ्या आयुष्यापासून कोसो दूर आहेत. आता वयाच्या तिशीत असताना मी हळूहळू सोशल एनक्झायटीशी डील करायला शिकली आहे. मी स्वतःहून हळूहळू लोकांशी बोलणे सुरू केले आहे. मला खात्री आहे की भले मी आता तिशीत असेन पण मला माझा जोडीदार मिळू शकतो आणि नाही मिळाला तरी मी यात खुश आहे की मी आयुष्यातील सर्वात मोठ्या समस्येवर मात केली आहे.
- माझं कुटुंब माझी प्रायोरिटी : मी डेट करण्यापेक्षा किंवा रिलेशनशिपमध्ये येण्यापेक्षा माझ्या कुटुंबाला प्राधान्य दिलं. त्यांची जबाबदारी घेणे माझ्यासाठी गरजेचं झालं होतं. या जबाबदारीच्या ओझ्याखाली मला कधीच माझ्या स्वतःच्या लाईफकडे लक्ष देता आलं नाही. मी आजही सिंगल आहे आणि माझ्या आयुष्यात कोणी नाही. पण लवकरच मला समजून घेणारं कोणीतरी येईल याची मला खात्री आहे.

### मी खूप सुंदर आहे...

मला सतत हेच वाटत राहिलं की मी खूप सुंदर आहे आणि मलाही तसाच देखणा मुलगा भेटावा. त्यानुसार भयंकर मुलांची ते देखील नाकी-डोळी सुंदर सुंदर मुलांची स्थळं आली पण मी चांगलं काय आहे हे दुर्लक्ष करून जे नाही तेच शोधत राहिली अन् सर्वांना नकारच देत आली. मी कायम परिपूर्ण आणि स्वप्नातील राजकुमार वगैरे अशा मुलाच्या शोधात राहिली जो मला कधी भेटलात नाही. पुढे वय वाढत गेलं अन् माझं सौंदर्य कालांतराने कमी होत गेलं अन् त्या टप्प्यापासून मी अनेक पुरूषांना पसंत करायचे पण तेच मला नकार देऊन निघून जायचे. त्यात इतक्या वर्षांत मला स्वतंत्र, एकटं जगण्याची सवय लागली होती त्यामुळे कोणा व्यक्तीसोबत जुळवून घेणंही कठीण जाणार होतं हे मी समजून चुकली अन् आयुष्यात कायमची सिंगल राहिली. सौंदर्याच्या अहंकारात ना कोणाला कधी डेट केलं ना कोणावर प्रेम..!






# गोदातीर समाचार






## नांदेड जिल्ह्यातील मिसींगमधील २४ लाख ८१ हजारांचे १५७ अँड्रॉईड मोबाईल हस्तगत; सायबर शाखेची कामगिरी

**नांदेड (प्रतिनिधी)**–नांदेड येथील पोलीस स्टेशनचे व स्थागुशाच्या पथकाने जिल्ह्यातील गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध वेगवेगळया ठिकाणी जावून एकूण १५७ मोबाईल किंमत २४ लाख ८१ हजार ५०० रूपयांची हस्तगत केले आहेत. त्यांचे पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते मोबाईलधारकांना वाटप करण्यात आले.



जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणाहून व बाजारातून म हागडे मोबाईल गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्याकरीता पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी सायबर ठाण्याचे पोलीस निरीक्षक धिरज चव्हाण यांना आदेशीत केले होते. त्यानुसार सायबर सेल, स्था.गु.शा. व जिल्ह्यातील सर्व पोस्टेचे पथक तयार करून मिसिंग मोबाईलचा शोध घेणेची मोहीम राबविण्यात आली होती.

शोध झालेल्या मोबाईलचे खचएख क्रमांकाची माहिती नांदेड पोलीस दलाचे Nanded Police या Facebook Page व Twitter वर टाकण्यात आली आहे. त्यापैकी नागरीकांनी आपल्या हरवलेल्या मोबाईलचा खचएख क्रमांक ओळखुन सायबर पो.स्टे. नांदेड येथून मोबाईल घेवून जाण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, डॉ. खंडेराय धरणे, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप, पोनि धिरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली, पो. स्टे सायबर पोउपनि एम.बी. चव्हाण, पोलीस अमंलदार राजेन्द्र सिटीकर, दिपक ओढणे, दाविद पिडगे, मोहम्मद असीफ, किशोर जैस्वाल, काशीनाथ कारखेडे, दिपक शेवाळे, ज्ञानेश्वर यन्नावार, दिपक राठोड, कांचन कसबे, शुभांगी जाधव यांनी पार पाडली आहे.

तसेच पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी उएखठ पोर्टलवर गहाळ झालेल्या आपल्या मोबाईलची माहिती अपलोड करण्याचे आवाहन केले आहे.

## अजित पवार यांच्या हस्ते आज उमरज व बोरीत कलशारोहण, लोकार्पण सोहळा

**कंधार (प्रतिनिधी)**– आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पुढाकारातून साकारलेल्या उमरज येथील मंदिराचा कलशारोहण आणि बोरी येथील महादेव मंदिर सभागृह लोकार्पण सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आणि राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे, अशी माहिती आ. चिखलीकर यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी या भागातील देवस्थानांच्या उद्धारासाठीही त्यांनी शासन दरबारी पाठपुरावा केला आहे. याच पाठपुराव्यातून कंधार तालुक्यातील उमरज येथील देवस्थानाच्या विकासासाठी भरीव असा निधी उपलब्ध करून दिला आहे. याच निधीतून उमरज येथील देवस्थान साकारले आहे. या मंदिराचा कलशारोहण सोहळा शुक्रवारी पार पडणार आहे. तसेच बोरी बुद्रुक येथील महादेव मंदिर येथील सभागृहाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. हा सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पार पडणार आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, राज्यमंत्री इंद्रनिल नाईक, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, प्रवीण पाटील चिखलीकर, राष्ट्रवादीचे जिल्हा अध्यक्ष दिलीप धम ाधिकारी, नांदेड महानगराध्यक्ष जीवन पाटील घोगरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील जनतेने आणि भक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी कंधार तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, शत्रुघ्न महाराज यांनी केले आहे

## कामठा (बु.) येथील हॉटेल 'रानमळा'मध्ये चोरी

**नांदेड (प्रतिनिधी)** – अर्धापूर तालुक्यातील कामठा बु शिवारात हरमिंदरसिंघ सुजानसिंघ काम ठेकर यांच्या 'रानमळा' हॉटेलम ध्ये चोरी झाली. ही घटना दि. २६ रोजी सकाळी सात वाजता उघडकीस आली.

बुधवारी सकाळी हॉटेल उघडले असता त्यांना लॉक खाली पडलेले दिसले. हॉटेलम धील भांडे, गोदरेज फ्रिज, हॉटपॉट, ग्रॅन्डर, तीन सिलेंडर असा एकूण ४६ हजारांचा ऐवज चोरीला गेला. या प्रकरणी अर्धापूर पोलीस स्टेशनमध्ये हरमिंदरसिंघ यांनी तक्रार दिलेली आहे.

## विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कवितावाचन

**नांदेड (प्रतिनिधी)**– कवीवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भाषा वायय व संस्कृती अभ्यास संकुल येथे यानिमित्ताने कुसुमाग्रज यांच्या कवितांचे वाचन करण्यात आले.



प्रारंभी डॉ. रमेश ढगे यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर संकुलातील प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर, डॉ. शैलजा वाडीकर, डॉ. योगिनी सातारकर, डॉ. नीना गोगटे यांच्यासह विद्यार्थी रेणुका व्यवहारे, नवनाथ काकडे, सुनंदा एंगडे, भाग्यश्री रोशनगांवकर, श्रद्धा वैद्य, भाग्यश्री जाहीर यांनी कुसुमाग्रज यांच्या कवितांचे वाचन केले.

डॉ. दिलीप चव्हाण यांनी अमर शेख यांच्या लेखातील उतारा वाचून दाखवला. शेवटी डॉ. पी. विठ्ठल यांनी कुसुमाग्रज यांच्या आठवणी सांगितल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मराठी विभाग प्रमुख डॉ. पृथ्वीराज तौर यांनी केले.

भाषा संकुलातील प्रा. डॉ. नीना गोगटे आणि प्रा. जिशान अली यांनी अनुक्रमे फ्रेंच व स्पॅनिश भाषेत कुसुमाग्रज यांच्या कवितांचे भाषांतर केले आहे. भाषांतरांच्या माध्यमातून कुसुमाग्रजांची कविता जगभर पोहचवण्याचे कार्य स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ करत आहे.

## धर्माबादमध्ये जबरी चोरी; दीड लाखाची सोनसाखळी पळविली

**नांदेड (प्रतिनिधी)** – धर्माबाद शहरात देवीगल्ली भागातील एका म हिलेच्या गळ्यातील दीड लाख रुपये किमतीची सोनसाखळी चोरट्यांनी जबरीने तोडून चोरून नेली. ही घटना २६ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास घडली.

बालमनी लक्ष्मण कतरोजू (वय ५१) ह्या लिंगुराम महागवले यांच्या घरासमोरून पायी घराकडे जात होत्या. यावेळी त्यांच्या पाठीमागून दुचाकीवर आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील २७ ग्रॅम वजनाची दीड लाख रुपये किमतीची सोनसाखळी जबरीने हिसकावून घेऊन पळून गेले. या प्रकरणी धर्माबाद पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड करत आहेत.

**मरळक शिवारातून जनावरांची चोरी**

लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मरळक शिवारातून सीमा पांडुरंग शिंदे यांच्या शेतातील आखाड्यावरून दोन गाय, एक गोर्हा असे ७० हजार रुपयांचे गोधन अज्ञात चोरट्याने चोरून नेले. २५ ते २६ फ ेब्रुवारीच्या दरम्यान ही जनावर चोरी केली. सीमा शिंदे हिच्या फिर्यादीवरून लिंबगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध जनावर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार पवार करत आहेत.

## रेल्वे स्थानकावर दोन तर बसस्थानक परिसरात एक अनोळखी मृतदेह आढळला

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या हजूर साहेब रेल्वे स्थानकावर दोघांचा तर मध्यवर्ती बसस्थानक परिसरात एकाचा मृतदेह आढळून आला आहे. या प्रकरणाचा शोध लोहमार्ग आणि वजिराबाद पोलीस घेत आहेत.

शहरातील हद्दीत रेल्वेस्थानक ते मध्यवर्ती बसस्थानक रस्त्यावर एका झाडाखाली ५५ वर्षीय अनोळखी पुरुषाचा मृत्यू झाला. मृत मयत हा ५० ते ५५ वर्षे वयोगटातील असून रंग सावळा, बांधा सडपातळ, उंची १५२ सेंटीमीटर, फुल बाह्याचा शर्ट, फिकट रंगाची पॅन्ट अंगावर दिसत आहे. तसेच रेल्वे स्थानक फलाट क्रमांक दोनवर ६५ वर्षीय अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला. यासोबतच फलाट क्रमांक एकवर बुकिंग काउंटरजवळ एक साठ वर्षीय महिलेचा मृतदेह आढळून आला. लोहमार्ग पोलिसांनी या दोन्ही मृतदेहांचा पंचनामा केला. दुसऱ्या घटनेतील मयत म हिलेचा रंग निमगोरा बांधा सडपातळ, उंची सव्वापाच फुट, चेहरा लांबट, नाक सरळ, अंगावर केसरी रंगाचा ब्लाऊज आणि चॉकलेट रंगाची साडी अशा वर्णनाची व्यक्ती कोणाचे नातेवाईक असल्यास लोहमार्ग पोलीस नांदेड किंवा पंकज पुरी आणि सचिन निकाळजे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक पांचाळ यांनी केले आहे.










## छत्रपती संभाजीनगर येथे रविवारी शिक्षक परिषदेची राज्यस्तरीय सर्वसाधारण सभा

### पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे –जिल्हाध्यक्ष डी.एम.पांडागळे

**नांदेड ( प्रतिनिधी)** – महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेची राज्यस्तरीय सर्वसाधारण सभा रविवार दि. २ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे प्रांताध्यक्ष मधुकरराव उन्हाळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. सभेला अखिल भारतीय शैक्षिक महासंघाचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष संजयकुमार राऊत (मध्यप्रदेश), अखिल भारतीय शैक्षिक म हासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष भिकाभाई पटेल (गुजरात) हे मार्गदर्शन करणार आहेत.

राज्य संघटनमंत्री सुरेश दंडवते, राज्यकार्यवाह पुरुषोत्तम काळे, विभागीय अध्यक्ष संजय कोठाळे यांची उपस्थिती राहणार आहे.

राज्यस्तरीय वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये शिक्षक परिषदेच्या राज्यस्तरीय कार्याचा आढावा तसेच सर्व जिल्हा शाखाचे कार्य अहवाल आढावा व राज्यस्तरीय शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नावर चर्चा करून ठराव संमत करण्यात येणार आहेत.

नांदेड जिल्ह्यातील शिक्षक परिषदेच्या सर्व जिल्हा, तालुका, विभाग, पदाधिकाऱ्यांनी २ मार्च रोजी समर्पण हॉल एमआयटी कॉलेजजवळ बीड बायपास छत्रपती संभाजीनगर येथील वार्षिक सर्वसाधारण सभेला कार्यकर्त्यांनी सकाळी १०.३० वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष डी. एम. पांडागळे यांनी केले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com